पुढारी

# ‘आव्हान’मध्ये शिवाजी विद्यापीठास रॅली सादरीकरणाचा फिरता चषक



कोल्हापूर : नांदेड येथे झालेल्या ‘आव्हान २०१९’ या राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिरात उत्कृष्ट रॅली सादरीकरणासाठीचा फिरता चषक पटकावलेल्या शिवाजी विद्यापीठाच्या संघासमवेत प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील. (छाया : नाज ट्रेनर)

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात झालेल्या ‘आव्हान २०१९’ या राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिरामध्ये शिवाजी विद्यापीठाच्या संघाने उत्कृष्ट रॅली सादरीकरणासाठीचा फिरता चषक पटकावला आहे.

विजयी संघाचे गुरुवारी सकाळी विद्यापीठात आगमन झाल्यानंतर प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील यांनी त्यांचे स्वागत करण्यात आले. राजभवन कार्यालय, महाराष्ट्र राज्य आणि राष्ट्रीय सेवा योजना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या सयुंक्त विद्यमाने ३ ते १२ जून २०१९ या कालावधीत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात ‘आव्हान २०१९’ राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिर पार पडले.

विद्यापीठाकडून कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांमधून प्रत्येकी ३० (२० मुले व १० मुली याप्रमाणे) शिबिरार्थी सहभागी झाले. शिबिरात राष्ट्रीय आपत्ती निवारण दल (एन. डी.आर.एफ.) आणि तज्ज्ञ मार्गदर्शक यांनी आपत्कालीन परिस्थितीत बचावकार्यासाठी तसेच आपत्तीची तीव्रता कमी करण्याच्या दृष्टीने आवश्यक प्रशिक्षण, मार्गदर्शन, प्रात्याक्षिक आणि सराव प्रशिक्षण दिले. ज्यात प्रामुख्याने, वैद्यकीय तसेच प्रत्यक्ष कृती यांचा समावेश होता.

संघाला कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी.के. गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले. सुजित मुंढे, संग्राम मोरे, संघ व्यवस्थापक प्रा. संगीता पाटील, प्रा. संजीवनी पाटील, प्रा. जयमाला उथळे, प्रा. महेंद्र वाघमारे, प्रा. टी. के. बदामे, प्रा. दिगंबर नागर्थवार यांनी परिश्रम घेतले.

लोकमत

## प्रवेश २७ जूनपासून : विविध अभ्यासक्रमासाठी ९२४५ परीक्षार्थी

# शिवाजी विद्यापीठातील प्रवेशाची तात्पुरती गुणवत्ता यादी सोमवारी

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठांतील विविध २७ पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठीची तात्पुरती गुणवत्ता यादी सोमवारी (दि. १७) जूनला प्रसिद्ध होणार आहे. त्यावर हरकती जाणून घेतल्यानंतर अंतिम गुणवत्ता यादी प्रसिद्ध करुन दि. २७ जूनपासून प्रत्यक्ष प्रवेश फेऱ्यांची सुरुवात होणार आहे.

कला, वाणिज्य आणि विज्ञान विद्याशाखांतील विविध २७ अभ्यासक्रमांसाठी मे महिन्यात विद्यापीठाकडून ऑफलाईन आणि ऑनलाईन पद्धतीने प्रवेश परीक्षा घेण्यात आल्या; त्यासाठी नोंदणी केलेल्या १०५०८ विद्यार्थ्यांपैकी ९२४५ जणांनी परीक्षा दिली. त्यांच्या प्रश्नपत्रिकांच्या मूल्यमापनाचे काम सध्या अंतिम टप्प्यात आले आहे. या अभ्यासक्रमांसाठीची तात्पुरती गुणवत्ता यादी दि. १७ जूनला प्रसिद्ध करण्यात येणार आहे. त्यावर हरकती, तक्रारी नोंदविण्यासाठी २० जूनपर्यंत मुदत राहणार आहे. त्यानंतर दि. २४ जूनला अंतिम गुणवत्ता यादी प्रसिद्ध होईल.

यानंतर तीन दिवसांनी प्रत्यक्ष प्रवेश घेण्याची प्रक्रिया सुरु होईल. ज्या अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षाचे निकाल जाहीर झालेले नाहीत. त्यांच्या द्वितीय आणि तृतीय वर्षासाठीची तात्पुरती प्रवेश प्रक्रिया सोमवार (दि. १७) पासून सुरु होणार आहे. विद्यापीठातील प्रत्येक अधिविभागामध्ये प्रवेशाची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी गुरुवारी दिली.

## आतापर्यंत २०७ परीक्षांचे निकाल जाहीर



परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून उन्हाळी सत्रात विविध अभ्यासक्रमांच्या एकूण ६३४ परीक्षा घेण्यात आल्या. त्यापैकी २०७ अभ्यासक्रमांचे निकाल आतापर्यंत जाहीर झाले आहेत. उर्वरित अभ्यासक्रमांच्या निकालाची प्रक्रिया सुरु असून, ते लवकरच जाहीर केले जातील. पदवी, पदव्युत्तर आणि पीएच.डी., एम.फिल. अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षांच्या मूल्यमापनाचे काम सुरु असल्याचे परीक्षा मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी गुरुवारी सांगितले.

# ए. डी. जाधव यांची निवड

कोल्हापूर : राज्य शासनाच्या रेशीम



सल्लागार समितीवर येथील शिवाजी विद्यापीठाच्या प्राणिशास्त्र विभागाचे सहयोगी प्रा.डॉ. ए. डी. जाधव यांची तज्ज्ञ सदस्य म्हणून नियुक्ती झाली. वस्त्रोद्योग सचिव समितीचे अध्यक्ष असून, नागपूरचे रेशीम संचालक सदस्य सचिव म्हणून काम पाहतील. डॉ. जाधव रेशीमशास्त्र विषयाचे अध्यापन, संशोधन, प्रसार व प्रचारासाठी योगदान देत आहेत. क्युबा देशासाठीही ते रेशीम सल्लागार म्हणून काम पाहत आहेत. त्यांच्या या योगदानाची दखल घेऊन या समितीवर त्यांची निवड केली आहे. सर्वांगीण रेशीम विकासाच्या दृष्टीने धोरण तयार करणे, सर्वकष कृती आराखडा तयार करणे, त्यांच्या अंमलबजावणीसाठी कामकाजाची दिशा ठरविणे, आदी कामकाज समितीमार्फत करणे अपेक्षित आहे.

पुढारी

# रेशीम सल्लागार समितीवर डॉ. जाधव यांची निवड



**कोल्हापूर :** महाराष्ट्र शासनातर्फे नुकत्याच स्थापन करण्यात आलेल्या रेशीम सल्लागार समितीवर शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र विभागातील सहयोगी प्रा. डॉ. ए. डी. जाधव यांची तज्ज्ञ सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. डॉ. जाधव रेशीमशास्त्र विषयाचे अध्यापन, संशोधन, प्रसार व प्रचार यासाठी मोलाचे योगदान देत आहेत.

My Kolhapur Edition
14 Jun, 2019 Page No. 8
Powered by : erelego.com

लोकमत

## नांदेडमध्ये शिबिर : कोल्हापूर, सांगली, साताऱ्यातील विद्यार्थ्यांचा सहभाग

# आव्हान चषक विद्यापीठाकडे

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात झालेल्या 'आव्हान २०१९' या राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिरामध्ये शिवाजी विद्यापीठाच्या संघाने उत्कृष्ट रॅली सादरीकरणासाठीचा फिरता चषक पटकाविला. विजयी संघाचे विद्यापीठात प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील यांनी गुरुवारी स्वागत केले.

राजभवन कार्यालय, महाराष्ट्र राज्य आणि राष्ट्रीय सेवा योजना, उच्च व तंत्रशिक्षण विभागातर्फे ३ जून ते १२ जून या कालावधीत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात 'आव्हान २०१९' या राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिर पार पडले. शिबिरात राज्यभरातील २१ विद्यापीठांतील एकूण १२३७ विद्यार्थी सहभागी झाले.



नांदेड येथे झालेल्या 'आव्हान २०१९' या राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिरात उत्कृष्ट रॅली सादरीकरणासाठीचा फिरता चषक पटकाविलेल्या शिवाजी विद्यापीठाच्या संघासमवेत प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, आदी उपस्थित होते.

## शिबिरात प्रशिक्षण, मार्गदर्शनाचा समावेश

शिबिरात राष्ट्रीय आपत्ती निवारण दल (एन. डी. आर. एफ.) आणि तज्ज्ञ मार्गदर्शक यांनी आपत्कालीन परिस्थितीत बचावकार्यासाठी तसेच आपत्तीची तीव्रता कमी करण्याच्या दृष्टीने आवश्यक प्रशिक्षण, मार्गदर्शन, प्रात्यक्षिक आणि सराव प्रशिक्षण दिले. ज्यात प्रामुख्याने वैद्यकीय तसेच प्रत्यक्ष कृती यांचा समावेश होता.



शिवाजी विद्यापीठाकडून कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यांमधून प्रत्येकी ३० (२० मुले आणि १० मुली याप्रमाणे) शिबिरार्थी सहभागी झाले. त्यांच्यासमवेत प्रत्येक जिल्ह्याकडून प्रत्येकी एक पुरुष आणि एक महिला संघव्यवस्थापक सहभागी झाले. विद्यापीठ संघाने शिबिरात उत्कृष्ट सहभाग नोंदविला आणि उत्कृष्ट रॅली सादरीकरणाचा फिरता चषक पटकाविला. संघाला कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले.

शिबिरात यशस्वी सहभागासाठी शिवाजी विद्यापीठ प्रशासनाच्या मार्गदर्शनाखाली सुजित मुंढे, संग्राम मोरे, संघव्यवस्थापक प्रा. संगीता पाटील, संजिवनी पाटील, जयमाला उथळे, महेंद्र बाघमारे, टी. के. बदामे, दिगंबर नागर्थवार यांनी परिश्रम घेतले.